**L. A. BILL No. LIII OF 2023.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA INTERNATIONAL SPORTS UNIVERSITY ACT, 2020.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३.**

**महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ अधिनियम, २०२० यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०२० चा महा. ३५. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ अधिनियम, २०२० यात सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम १२ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ अधिनियम, २०२० याच्या कलम १२ मध्ये ,– २०२० चा महा. ३५.

(१) पोट-कलम (३) मधील ,–

(क) खंड (क) मध्ये ,-

(एक) " समिती " या मजकुराऐवजी, " शोध-नि-निवड समिती " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (एक) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :–

" (एक) कुलपतीने नामनिर्देशित केलेला एक सदस्य असेल, जो, उच्च शिक्षण क्षेत्रातील ख्यातनाम व्यक्ती असेल आणि जो एकतर, शिक्षण किंवा क्रीडा क्षेत्रातील राष्ट्रीय कीर्तीचा ख्यातनाम विद्याव्यासंगी किंवा पद्म पुरस्कार प्राप्त व्यक्ती असेल ;";

(तीन) उप-खंड (तीन) नंतर, पुढील उप-खंड जादा दाखल करण्यात येईल :–

" (चार) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षाने नामनिर्देशित केलेला एक सदस्य.";

(ख) खंड (ग) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (ग) समितीवर नामनिर्देशित केलेले सदस्य हे, विद्यापीठाशी अथवा विद्यापीठाच्या कोणत्याही महाविद्यालयाशी किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त परिसंस्थेशी कोणत्याही रीतीने संबंधित नसलेल्या व्यक्ती असतील.";

(ग) खंड (घ) मधील, " तीन " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(घ) खंड (च) मध्ये ,-

(एक) उप-खंड (एक) मधील, " किंवा क्रीडा प्रवर्तन यातील " या मजकुरानंतर, " किमान, दहा वर्षांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (चार) मधील, " शैक्षणिक अर्हता " या मजकुराऐवजी, " अतिरिक्त शैक्षणिक अर्हता " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (४) मधील ,-

(क) विद्यमान परंतुकापूर्वी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :-

" परंतु, जर कुलपतीने निवड केलेली व्यक्ती, कुलगुरु पदाचा कार्यभार स्विकारीत नसेल तर, कुलपतीस, नामिकेमधील उर्वरित व्यक्तींमधून अन्य सुयोग्य व्यक्तीची निवड करता येईल किंवा त्यास, एकतर त्याच समितीकडून किंवा या प्रयोजनासाठी नवीन समिती घटित केल्यानंतर अशा नवीन समितीकडून, नवीन नामिकेची मागणी करता येईल.";

(ख) विद्यमान परंतुकामधील, " परंतु, " या मजकुराऐवजी, " परंतु आणखी असे की, " हा मजकूर, दाखल करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३. ]**

**[ महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ अधिनियम, २०२० यात सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[ श्री. संजय बनसोडे,**
क्रीडा व युवक कल्याण मंत्री. ]

**[विधानसभेने दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**[ विधानपरिषदेने दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

---

शासकीय मुद्रणालय, नागपूर.